## प्रकरण - सहा

## निष्कर्ष व शिफारशी


६.१ प्रास्ताविक

६.२ अध्यापकांचा अनुभव व शैक्षणिक अर्हता

६.३ मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण

६.४ मूल्ये आणि त्यांचे संक्रमण

६.५ हस्तपुस्तिका व तिचे स्वरूप

६.६ मूल्य आणि अभ्यासपूरक-अभ्यासेत्तर उपक्रम

६.७ मूल्यसंक्रमणाचे प्रमाण

६.८ मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी

६.९ मूल्यांचे मूल्यमापन

६.१० मूल्यांच्या मूल्यमापनाच्या नोंदी

६.११ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी

६.१२ पुढील संशोधनासाठी विषय

## ६.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय " उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास " हा आहे. या विषयाच्या संदर्भात मराठीचे अध्यापक पाठ्यपुस्तकांचे अध्यापन करत असताना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याच्या दृष्टीने कोणकोणते प्रयत्न करतात ? मूल्यांचे दृढीकरण करण्यासाठी काही उपक्रमांची योजना करतात का ? मूल्यसंक्रमणात कोणकोणत्या अडचणी येतात ? मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करता येईल ? मूल्यांचे मूल्यमापनासंबंधी अध्यापकांचा दृष्टिकोन काय आहे ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने इयत्ता ११ वी व १२ वीच्या वर्गांना मराठीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी एक प्रश्नावली तयार केली होती. या प्रश्नावलीची माहिती प्रकरण १ पृष्ठांक १४ते१६ वर दिलेली आहे. प्रश्नावलीच्याद्वारे मिळालेली माहिती पडताळून पाहण्यासाठी संशोधिकेने सहा मुलाखती घेतल्या. मुलाखत घेण्यासाठी तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ट ' क ' मध्ये दिलेली आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या त्यांची नावे परिशिष्ट ' ड ' मध्ये दिली आहेत. त्याचप्रमाणे संशोधिकेने उच्च माध्यमिक विद्यालयांना भेटी देऊन मराठीच्या अध्यापकांच्या २० पाठांचे निरीक्षण केले. ज्या शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण केले आणि त्यांच्या ज्या पाठांचे निरीक्षण केले त्यांची यादी परिशिष्ट ' इ ' मध्ये दिलेली आहे.

मागील प्रकरण पाचमध्ये अध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे तसेच मुलाखती आणि निरीक्षणाच्या द्वारे उपलब्ध झालेल्या सामग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण केले असून अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविण्यात आलेले आहेत.

६.२ <u>अध्यापकांचा अनुभव व शैक्षणिक अर्हता</u> :

सारणी क्रमांक ५.१ वरून (पृष्ठांक११४ व ११५) असे दिसून येते की, अध्यापकांचा मराठी विषय शिकविण्याचा अनुभव १४, १३ वर्षे इतका आहे. अध्यापकांचा हा अनुभव कोणताही मानदंड लावला तरी दीर्घ मानावा लागेल.

सारणी क्रमांक ५.३ (पृष्ठांक ११७ ) व सारणी क्र. ५.४ (पृष्ठांक ११८ ) या दोन्ही सारण्यांवरून असा निष्कर्ष निघतो की, उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन करणाऱ्या मराठीच्या अध्यापकाकडे आवश्यक ती शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आहे.

६.३ <u>मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण</u> :

सारणी क्रमांक ५.५ वरून (पृष्ठांक ११९ ) असे स्पष्ट होते की, एकाही अध्यापकाचे मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण झालेले नाही.

याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, <u>मूल्यशिक्षण-विषयक सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय करणे आवश्यक असून ती प्रशिक्षण महाविद्यालये विस्तारसेवा केंद्र, एस.सी.ई.आर.टी., एन.सी.ई.आर.टी. इत्यादी संस्थांमार्फत केली जावी.</u>

या शिबिरांतून मूल्यशिक्षण म्हणजे काय ? येथपासून ते बौध्दिक, भावनिक आणि क्रियात्मक पातळीवर संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन कसे करावे ? येथपर्यन्तच्या मूल्यशिक्षणाच्या विविध अंगोपांगा-विषयी शिक्षकांचे उद्बोधन करण्यात यावे. तसेच उपयुक्त साहित्य तयार करून देण्यात यावे.

ही शिबिरे शनिवार, रविवार वा दीर्घ सुट्टीच्या कालावधीत आयोजित करण्यात यावीत.

या शिबिराला उपस्थित राहाण्यासाठी मराठीच्या अध्यापकांना सर्वतोपरी उत्तेजन देऊन पाठविण्यात यावे.

६.४ <u>मूल्ये आणि त्यांचे संक्रमण</u> :

सारणी क्रमांक ५.६ वरून (पृष्ठांक १२१ ) असे आढळून आले की १५ अध्यापकांपैकी १३ अध्यापकांनी (८६.६६ टक्के अध्यापकांनी) मराठीचे अध्यापन करताना पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जाते असे नमूद केले आहे. तर १५ पैकी २ अध्यापकांनी (१३.३३ टक्के)अध्यापकांनी) मराठी विषयाचे अध्यापन करताना पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जात नाही असे नमूद केले आहे.

बहुसंख्य अध्यापकांच्या (८६.६६ टक्के अध्यापकांच्या) मतानुसार पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जाते असे नमूद केले आहे. ही मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट मानावयास हवी.

तथापि संशोधिकेने केलेल्या २० पाठनिरीक्षणातून व घेतलेल्या सहा मुलाखतींतून असे निदर्शनास आले आहे की, दैनंदिन पाठाची जी टाचणे अध्यापक काढतात त्यात ते पाठात अनुस्यूत असलेल्या मूल्यांची नोंद करीत नाहीत. तेव्हा याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, <u>विद्यार्थ्यांमध्ये यशस्वीरित्या मूल्यसंक्रमण करता यावे यासाठी पूर्वतयारी म्हणून `मूल्यशोधपत्रक` तयार केले जावे इतकेच नव्हे तर मूल्यशोधपत्रकात नमूद केलेली मूल्ये कशाप्रकारे संक्रमित करावयाची याचीही नोंद असावी.</u>

सारणी क्रमांक ५.७ वरून (पृष्ठांक १२६ ) असे स्पष्ट होते की, अध्यापक विविध मार्गांचा अवलंब करून पाठातील मूल्ये स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. मात्र ` अभिनय ` सोडल्यास कोणत्याही दृक्-श्राव्य साधनाचा वापर मूल्य रुजविण्यासाठी केला जात नाही.

मूल्ये ही केवळ बौध्दिक स्तरावरच रुजवावयाची नसून ती भावनिक आणि क्रियात्मक स्तरावरही रुजवावयाची आहेत. सबब दृक्-श्राव्य साधनांचा ✓ वापर करून विद्यार्थ्यांच्या अंत:करणास स्पर्श करणारे अध्ययन अनुभव देऊन त्यांचा भावपिंड घडविण्याच्या दृष्टीने मूल्य शिक्षणात दृक्-श्राव्य साधनांचा आवर्जून वापर करण्यात यावा.

सारणी क्रमांक ५.८ वरून (पृष्ठांक १२८ ) असे स्पष्ट होते की, परीक्षेत मूल्याधारित प्रश्न विचारले जात नाहीत म्हणून त्यादृष्टीने अध्यापन केले जात नाही. तसेच मूल्यसंक्रमणावर भर दिल्यास अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही म्हणून मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न केले जात नाहीत.

एकतर विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार करणे हे शिक्षण-प्रक्रियेचे केवळ उद्दिष्ट असूच शकत नाही. तसेच अभ्यासक्रम पूर्ण करणे हेही अध्यापनाचे उद्दिष्ट असू शकत नाही. तो अभ्यासक्रम ज्या विद्यार्थ्यांसाठी राबवावयाचा आहे त्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे सर्वांगिण विकसन होणे महत्वाचे आहे. तिसरे असे की, मूल्यसंक्रमण हे पाठाचे अध्यापन करीत असतानाच करावयाचे आहे. त्यासाठी वेगळा वेळ द्यावयाचा नाही. तरी अशी शिफारस करावीशी वाटते की, अध्यापकांनी शिक्षणप्रक्रियेत मूल्य-संक्रमणास पर्याय नाही असे मानून उपरोक्त कारणांच्यामुळे मूल्यसंक्रमण करण्याचे थांबवू नये.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ६.५ हस्तपुस्तिका व तिचे स्वरूप :

सारणी क्रमांक ५.९ वरून (पृष्ठांक १३० ) असा निष्कर्ष निघतो की, उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश अध्यापकांना (८० टक्के अध्यापकांना) पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये कशी रूजवावयाची यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. सबब अशी शिफारस करण्यात येते की, इयत्ता ११ वी व १२ वीचे युवक भारती हे पाठ्यपुस्तक तयार करणाऱ्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी उच्च माध्यमिक स्तराची (प्रथम भाषा) विषयाची पाठ्यपुस्तके तयार करतानाच त्यातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये कोणती ? आणि ती कशी संक्रमित करता येतील यासंबंधीची हस्तपुस्तिका काढावी.

सारणी क्रमांक ५.१० वरून (पृष्ठांक १३३ ) प्रस्तुत हस्तपुस्तिकेच्या स्वरूपासंबंधी पुढील शिफारशी करण्यात येत आहेत :

१) हस्तपुस्तिकेतून पाठातील मूल्यांचे अचूक दिग्दर्शन व्हावे.

२) मूल्ये समजण्यासाठी जी उदाहरणे, दाखले व दृष्टांत दिले जातील ते विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संबंधित असावेत.

३) यशस्वीरीतीने मूल्यसंक्रमण आणि संवर्धन करण्यासाठी ती मार्गदर्शनपर असावी.

४) हस्तपुस्तिकेत मूल्याधारित प्रश्न असावेत.

## ६.६ मूल्य आणि अभ्यासपूरक-अभ्यासेत्तर उपक्रम :

सारणी क्रमांक ५.११ वरून (पृष्ठांक १३६ ) असे निदर्शनास येते की, बहुसंख्य अध्यापक (६० टक्के) पाठ्यपुस्तकाच्या अध्यापनाच्या अनुषंगाने मूल्ये रूजविण्यासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रम राबवीत नाहीत.

याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, केवळ वर्ग अध्यापनाच्या द्वारेच मूल्य संक्रमित करता येत नाहीत. मूल्ये संक्रमित करून, विद्यार्थ्यांचे ठिकाणी ती स्थिर होऊन संस्काराची क्रिया पूर्ण होण्यासाठी अध्यापनाच्या जोडीला अभ्यासपूरक वा अभ्यासेत्तर उपक्रम राबविण्याची नितांत गरज आहे. तरी शाळात हेचे उपक्रम आवर्जून राबवावेत.

सारणी क्रमांक ५.१२ वरून (पृष्ठांक १३९ ) ४० टक्के अध्यापक मूल्य रुजविण्यासाठी पुढील उपक्रम राबवितात असे निदर्शनास येते.

स्पर्धा - निबंध, वक्तृत्व, वादविवाद.

सामुदायिक जीवनाचे उपक्रम - श्रमदान, समाजसेवा, सांस्कृतिक कार्यक्रम.

जयंत्या व पुण्यतिथ्या - साज-या करणे.

खेळांचे आणि क्रीडास्पर्धांचे आयोजन.

अवांतर वाचनास उत्तेजन.

सहली काढणे.

विद्यार्थ्यांची नाटके बसविणे.

सुविचार सांगणे.

बाहेरील वक्त्यांची भाषणे.

उपरोक्त उपक्रम हे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याच्या दृष्टीने सुयोग्य असे असून ज्या शाळांमधून ते राबविले जात नसतील त्या शाळांनी ते आवर्जून राबवावेत अशी शिफारस करावीशी वाटते.

सारणी क्रमांक ५.१२ मध्ये (पृष्ठांक १३९ ) कथन केलेले उच्च माध्यमिक स्तरावर, राबविले जाणारे वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद अवांतर वाचनास उत्तेजन हे उपक्रम केवळ बौध्दिक पातळीवर भर देणारे वाटतात

परंतु क्रियात्मक पातळीवर मूल्यात्मक विकास व्हावा या दृष्टीने उपयुक्त असलेले सामुदायिक जीवनाचे उपक्रम - श्रमदान, समाजसेवा, सहली या सारखे उपक्रम कमी राबविले जातात - तरी विद्यार्थ्यांचा क्रियात्मक पातळीवर विकास व्हावा यासाठी वर निर्देशित केलेल्या सामुदायिक जीवनाच्या उपक्रमाबरोबरच संग्रह तयार करणे, प्रदर्शन भरविणे, शालेय स्वराज्य, सहकारी भांडार चालविणे, रचनाकृती निर्मिती, नाटयीकरण, भूमिकाभिनय, प्रयोग करणे, कार्यानुभव अशाप्रकारचे उपक्रम राबविले जावेत.

६.७ मूल्यसंक्रमणाचे प्रमाण :

सारणी क्रमांक ५.१३ वरून (पृष्ठांक १४२ ) असे स्पष्ट होते की -

१) बहुतांश अध्यापकांच्या (६६.६६ टक्के) मते विद्यार्थ्यांमध्ये ` बऱ्याचशा प्रमाणात ` मूल्य संक्रमित होतात.

२) मूल्ये ` संपूर्णपणे ` किंवा ` अजिबात संक्रमित होत नाहीत ` असे मत एकाही अध्यापकाने नोंदविलेले नाही.

६.८ मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी :

सारणी क्रमांक ५.१४ वरून (पृष्ठांक १४५ व १४६) असे स्पष्ट होते की -

परीक्षांमध्ये मूल्यांवर आधारित प्रश्न असावेत तथापि परीक्षेतील मूल्याधिष्ठित प्रश्नांच्या द्वारे केवळ ज्ञानात्मक पातळीवरील मूल्यमापन होईल परंतु भावात्मक आणि क्रियात्मक पातळीवरील मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन होऊ शकणार नाही. त्यासाठी मूल्याधिष्ठित उपक्रम राबवून त्यांचे निरीक्षण करून मूल्यांचे मूल्यमापन केले जावे.

राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात मूल्यांची अधोगती झालेली आहे. त्यामुळे मूल्यसंक्रमणात अडचणी येतात. याचा विचार करूनही मूल्य रुजविण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जावे आणि ही परिस्थिती एक आव्हान आहे असे समजून त्यावर मात करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जावेत. नाही तर या परिस्थितीत केव्हाच बदल होणार नाही आणि शिक्षणाला अपेक्षित ते व्यक्तिगत आणि सामाजिक परिवर्तन करण्यामध्ये अपयश आले असे नाईलाजास्तव नमूद करावे लागेल. तेव्हा मूल्यांच्या विषयी योग्य ती अभिरुची निर्माण करून, योग्य ती अभिवृत्ती निर्माण करून मूल्यसंवर्धनाचे कार्य केले पाहिजे.

सारणी क्रमांक ५.१५ वरून (पृष्ठांक १५१ ) असे स्पष्ट होते की, उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापकांनी मूल्यशिक्षणाच्या संदर्भातील अडचणींवर मात करण्याचे पुढील तीन मार्ग सुचविले आहेत :

१. जादा वेळ देऊन
२. प्रश्नपत्रिका मूल्याधिष्ठित ठेवून.
३. शिक्षक-पालक मेळावे भरवून व पालकांना मूल्यशिक्षणाचे महत्व पटवून देऊन.

यातील सांगितलेल्या पहिल्या मार्गाबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकांनी जादा वेळ देण्याचे कारण नाही. मूल्यशिक्षण हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय न मानता शालेय पाठ्यक्रमातील विविध विषय व अभ्यासपूरक उपक्रम यांमधून एकात्म पध्दतीने व योजनाबध्द रीतीने हाताळला जावा.

' प्रश्नपत्रिका मूल्याधिष्ठित ठेवून ' या संदर्भात पूर्वीच शिफारस केलेली असल्यामुळे (पहा पृष्ठांक १७९ ) पुनरुक्तीचा दोष टाळण्यासाठी त्या विषयीची शिफारस पुन्हा येथे केलेली नाही.

LIBRARY KOLHA

<u>शिक्षक-पालक मेळावे भरवून व पालकांना मूल्यशिक्षणाचे महत्व पटवून देऊन हा मार्ग योग्य वाटतो</u>. याबाबत आणखीही एक शिफारस करावीशी वाटते की, <u>पालकांना विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल कळवितांना मूल्यसंदर्भात त्याचे वर्तन कसे होते याची नोंद प्रगतीपत्रकात केली जावी</u>.

सारणी क्रमांक ५.१६ वरून (पृष्ठांक २५४ ) असे स्पष्ट होते की -

१) मूल्यसंक्रमणासाठी आदर्शांची गरज असते म्हणून प्राचार्य मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक यांनी सुसंस्कारासाठी शाळेचे वातावरण जितके अनुकूल राखता येईल तितके राखण्याचा प्रयत्न करावा.

२) अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमांमधून, थोर पुरूषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करून विद्यार्थ्यांपुढे आदर्श ठेवावेत.

३) पाठातील आदर्श अध्यापकाने विद्यार्थ्यांपुढे जाणीवपूर्वक ठेवावेत.

४) प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा जो मूल्यांशी एकनिष्ठ असतो तीच मूल्य रूजल्याची मोठी कसोटी मानावी लागेल. आणि या निकषांपर्यन्त मूल्य रूजविणे हे मूल्यशिक्षणाचे अत्युच्च उद्दिष्ट आहे हे लक्षात घेऊन विद्यार्थ्याला त्या उंची पर्यन्त जाता येईल इतपत प्रयत्न केला पाहिजे.

६.९ <u>मूल्यांचे मूल्यमापन</u> :

सारणी क्रमांक ५.१७ वरून (पृष्ठांक २५८ ) असे निदर्शनास येते की, प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या ३३.३३ टक्के अध्यापकांच्या मते विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन करावे.

हे मूल्यमापन करण्यासाठी निरीक्षण, चाचणी, मुलाखत, सृजनात्मक कार्य, प्रसंगनिर्मिती आणि स्वयंमूल्यमापन हे मार्ग सुचविले (पहा सारणी क्र. ५.१८, पृष्ठांक १६० ) आहेत. या संदर्भात अशी शिफारस करावीशी वाटते की, विद्यार्थ्यांत संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन करण्यासाठी वर सुचविलेले मार्ग योग्यच आहेत तथापि ते पुरेसे आहेत असे वाटत नाही सबब त्यासाठी पडताळासूची, पदनिश्चयन श्रेणी, समाजमिती या सारख्या तंत्रांचाही अवलंब करावा.

६.१० मूल्यांचे मूल्यमापनाच्या नोंदी :

मूल्यांचे मूल्यमापन करताना पुढील प्रमाणे नोंदी कराव्यात असे ५ अध्यापकांनी म्हणजेच ३३.३३ टक्के अध्यापकांनी सांगितले आहे. (पहा पृष्ठांक १६५ ).

१) विद्यार्थ्यांनी लिहिलेली दैनंदिनी हीच त्याने ठेवलेली नोंद महत्त्वाची मानावी.

२) श्रेणी देऊन नोंदी कराव्यात.

३) वर्तन - प्रवृत्ती - झालेला संस्कार - निवडलेला मार्ग या प्रमाणे नोंद ठेवावी.

४) पदनिश्चयन श्रेणीने नोंद ठेवावी.

५) पडताळा सूचीच्या साह्याने मूल्यांच्या मूल्यमापनाची नोंद ठेवावी.

६) विविध प्रकल्प राबवून प्रत्येक मुलाचे मूल्यांच्या अनुषंगाने मूल्यमापन करावे.

मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा :

सारणी क्रमांक ५.२० वरून (पृष्ठांक १६७ ) असे आढळून येते की, ७३.३३ टक्के अध्यापकांनी मूल्यांचे मूल्यमापन आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा असा अभिप्राय व्यक्त केला तर २६.६६ टक्के अध्यापकांनी हा संबंध जोडू नये असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

सारणी क्रमांक ५.२१ वरून (पृष्ठांक १७० ) असे आढळून येते की -

८ अध्यापकांनी म्हणजेच प्रतिसाद दिलेल्या शेकडा ६६.६६ टक्के अध्यापकांनी (एकूण अध्यापक संख्येच्या ५३.३३ टक्के)अध्यापकांनी) परीक्षेत निबंधवजा स्वरूपाचे मूल्याधिष्ठित प्रश्न विचारून परीक्षा आणि मूल्यमापन यांचा संबंध जोडावा असे नमूद केले आहे.

परीक्षेतील गुण व वर्णभरात घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या गुणात्मक नोंदी यांचा संबंध जोडून मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडावा असा अभिप्राय ४ अध्यापकांनी म्हणजेच शेकडा २६.६६ टक्के अध्यापकांनी (एकूण अध्यापक संख्येच्या ३३.३३ टक्के अध्यापकांनी) व्यक्त केला आहे.

६.११ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :

आतापर्यन्त अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादावर आधारित निष्कर्ष काढले आणि त्यावर शिफारशी सुचविल्या. या भागात सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहेत.

मूल्यशिक्षणासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तास व खास शिक्षक नसावेत.

मूल्यशिक्षणातील कार्यक्रम धार्मिक शिक्षणापासून अलिप्त ठेवावेत. मात्र निरनिराळ्या धार्मिक ग्रंथातील कथा, प्रसंग, तत्वे यांचा मूल्य शिक्षणासाठी उपयोग करुन घ्यावा.

अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाप्रमाणेच सेवापूर्व प्रशिक्षणातही मूल्याधिष्ठित अध्यापनाविषयी प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. सबब अशी शिफारस करावीशी वाटते की, सेवापूर्व प्रशिक्षणातही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात उपयुक्त ठरणाऱ्या अध्यापनपध्दतींबाबत विशेष माहिती दिली जावी.

मूल्यांचे यशस्वीपणे संक्रमण होण्यासाठी अध्यापक स्वतः मूल्ये जपणारा असावा.

विद्यार्थ्यांच्या सध्याच्या शालेय प्रगतीपुस्तकात विद्यार्थ्यांचे ठिकाणी मूल्ये किती प्रमाणात रुजली याचा उल्लेख नसतो. तो स्वतंत्रपणे केला जावा. हा अंकात करता येत नसल्याने श्रेणीबध्द स्वरुपात किंवा विधानात्मक स्वरुपात केला जावा.

मूल्यसंवर्धन ही कुटुंब, शाळा, समाज या सर्वांचीच जबाबदारी आहे. मुलाचे उचित-अनुचित वर्तन वेळोवेळी त्याच्या पालकांना कळविण्यात यावे. चांगल्या वर्तनाबद्दल प्रशंसा व वाईट वर्तनाबद्दल कानउघाडणी केली जावी. मात्र अशी समज त्याला एकांतात व विश्वासात घेऊन द्यावी. अनिष्ट वर्तनाचे परिणाम त्याला दाखवून द्यावेत. त्याच्या सद्भावनांना आवाहन करुन त्याच्या वर्तनात इष्ट परिवर्तन व्हावे या दृष्टीने प्रयत्न करावेत.

### ६.१२ पुढील संशोधनासाठी विषय :

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यन्तच्या भागात या संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी सादर केल्या. हे संशोधन करत असताना संशोधिकेला काही समस्या जाणवल्या. त्या समस्या प्रस्तुत संशोधन-विषयाशी प्रत्यक्ष संबंधित नसल्यामुळे संशोधिकेने मूळापर्यन्त परामर्श घेतला नाही. तथापि समस्यांचा असा अभ्यास केला गेल्यास तो प्रस्तुत संशोधन समस्येच्या सर्वांगिण सम्यक् आकलनास उपकारकच ठरेल असे वाटल्यामुळे त्या समस्यांचा खालील परिच्छेदांमधून पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

१) हे संशोधन इयत्ता ११ वी व १२ वीच्या मराठी (प्रथमभाषा) विषयाचे आहे. इतर विषयांच्या संदर्भातही असे संशोधन करता येईल.

२) प्राथमिक, माध्यमिक स्तरावरही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अशाप्रकारचे संशोधन करता येईल.

३) मूल्यांचे मूल्यमापन यथार्थ, विश्वसनीय, वस्तुनिष्ठ कसे करता येईल याबाबत संशोधन करता येईल.

४) मूल्यांचे मूल्यमापन करणारी प्रमाणित चाचणी तयार करण्याबाबतही संशोधन करता येईल.